# डॉ. आप्पासाहेब पवार यांना आदरांजली

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ३७ व्या पुण्यतिथीनिमित्त कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. या पुण्यतिथीच्या निमित्ताने डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनीच्या वतीने शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांचे 'डॉ. आप्पासाहेब पवार कार्य व कर्तृत्व' या विषयावर व्याख्यान झाले. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष व माजी बीसीयूडी संचालक प्राचार्य डॉ. बी.एल. पाटील यांच्या निधनानिमित्त श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही.डी. नांदवडेकर,विद्यार्थी कल्याण मंडळप्रमुख डॉ. आर. व्ही. गुरव, प्रबोधिनिचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. एस.जे.नाईक, सचिव प्रा.टी.के. सरगर आदी उपस्थित होते.

लोकमत

# दिव्यांग हे सर्वसामान्यांपेक्षा वेगळे नाहीत : राजेंद्र हिरेमठ

## शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** क्षमता, पात्रतेचा विचार केला, तर दिव्यांग सर्वसामान्यांपेक्षा वेगळे नाहीत. शैक्षणिक, प्रशासकीय, क्रीडा, सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रांमध्ये दिव्यांगांनी उंच भरारी घेतली आहे. त्यांच्या सहायकाची भूमिका समाजाने निभवावी, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र-समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यु. जी. सी. स्कीम फॉर पर्सन विथ डिसेबल आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्यावतीने जागतिक ब्रेल दिनानिमित्त आयोजित ‘दिव्यांग हक्क कायदा २०१६’ या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, पुणे विद्यापीठातील सेंटर फॉर इन्क्लुझीव्ह एज्युकेशन आणि अक्सेसीबिलीटीचे समन्वयक धनंजय भोले प्रमुख उपस्थित होते. डॉ. नांदवडेकर म्हणाले, दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामूहिक प्रयत्न केल्यास जगामध्ये ते आदर्शवत होतील. कार्यशाळेचे उद्घाटन प्रमुख उपस्थितांच्या हस्ते रोपाला पाणी घालून झाले. यानंतर ‘गगनाला पंख नवे’, ‘दिव्यांगज’ ह्या लघुचित्रफीती दाखविल्या. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांचा सत्कार केला. संयोजक डॉ. नमिता खोत यांनी स्वागत केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले.

### हक्क अंमलात आणावेत

**‘हेल्पर्स ऑफ दी हँडिकॅप’च्या अध्यक्षा नसीमा हुरजूक म्हणाल्या, दिव्यांगांना कायद्याने प्राप्त झालेले हक्क सर्वच क्षेत्रांमध्ये अंमलात आणावेत. अडचणींकडे संधी म्हणून पाहून नवी दृष्टी निर्माण करण्यासाठी त्यांना बळ देणे गरजेचे आहे.**

- 5 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# महर्षी शिंदे यांचा स्वतंत्र अभ्यास करण्याची गरज

## डॉ. गोपाळ गुरू यांचे प्रतिपादन : भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न: संशोधन कार्य चर्चासत्र उत्साहात

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

अनुभवशील चिंतनातून संशोधनपर लेखनामध्ये झळकणारा अस्सलपणा हे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या साहित्याचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नांची अत्यंत मूलभूत,वस्तुनिष्ठ मांडणी त्यांनी केली आहे. त्यामुळे त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. गोपाळ गुरु यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन आणि एन.डी. पाटील प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. तसेच 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न: संशोधन व कार्य' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या. ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन.डी. पाटील उद्घाटक म्हणून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले प्रमुख उपस्थित होते. यंदाचे महाराष्ट्र राज्य वाङ्मय पुरस्कार प्राप्त करणारे ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार, गावठाणकार कृष्णात खोत यांचा डॉ. गोपाळ गुरु यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



पुढे डॉ. गोपाळ गुरु म्हणाले, अस्पृश्यता वाहती राखण्यात उच्चवर्णीय समाजाचा स्वार्थ आहे. कारण ती तुंबली की संपली, याची जाणीव असल्याने ती थांबविली जात नाही. त्यामुळे महर्षी शिंदे यांनी व्यवस्थेला 'बहिष्कृतांची बंदिशाळा' असे संबोधले होते. अशी अनेक रुपके महर्षींच्या लेखनात जागोजागी आढळतात. आत्मटीका हा सुद्धा महर्षींच्या लेखनाचा गुणधर्म होता. त्यांनी कशाचीही तमा न बाळगता आपण अंगिकारलेले कार्य करीत राहिले. हेच त्यांचे सर्वात महत्त्वाचे वेगळेपण आहे.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, महर्षी शिंदे यांनी संपूर्ण हयात अस्पृश्यता निवारणासाठी वेचली. त्यांनी आपल्या कार्याने साऱ्या महाराष्ट्राची मान उंचावली. महाराष्ट्राने मात्र त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा फारसा गांभिर्याने विचार केला नाही. अध्यक्षीय भाषणात डॉ. पाटील म्हणाल्या, महाराष्ट्राला पुरोगामी ओळख प्रदान करून देण्यामध्ये महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बरोबरीने महर्षी शिंदे यांचे योगदान आहे.

डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. राजन गवस, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. भारत पाटणकर, डॉ. गेल ऑम्वेट, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. जगन कराडे, डॉ. व्यंकाप्पा भोसले, डॉ. अरुण शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. मेघा पानसरे, दशरथ पारेकर, डॉ. रफिक सूरज, डॉ. सुरेश शिपूरकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JAN 2019
Times of India

# 48 projects selected at Avishkar fest

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** As many as 48 scientific projects have been selected during the central level Avishkar research festival conducted at the Shivaji University, Kolhapur (SUK) on Friday.

"The shortlisted projects will participate in state-level Avishkar festival to be conducted on January 15 at Gadchiroli-based Gondwana University," AM Gurav, student welfare officer of SUK, said.

According to Gurav, of the 48 projects, 12 each are from undergraduate (UG), post-graduate, MPhil/PhD and teachers' categories, respectively. "This year also saw largest number of participants in the coveted research festival. As many as 886 research projects and around 1,880 participants participated in the festival that is governed by the chancellor's office," he said.

Gurav added that most of the participants were from UG category, where Kolhapur district topped the number of participants with 276 participations followed by Satara (245) and Sangli (139). A varsity official said from the day of its inception in 2006, the festival is witnessing a rousing response with each passing year.

5 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रविकासात वैज्ञानिक संशोधन मोलाचे

## 'आविष्कार' महोत्सव अध्यक्ष डॉ. गुरव यांचे प्रतिपादन




**पेठ वडगाव : येथे यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करताना माजी नगरसेवक राजकुमार पोळ, प्राचार्या डॉ. विजया चव्हाण आदी मान्यवर.**

**प्रतिनिधी**
पेठ वडगाव

राष्ट्रविकासात वैज्ञानिक संशोधन मोलाचे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोणाशिवाय भारत महासत्ता होणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ आविष्कार संशोधन महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. ते येथील विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय अविष्कार महोत्सवात बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजया चव्हाण होत्या. संस्था प्रतिनिधी व वडगावचे माजी नगरसेवक राजकुमार पोळ प्रमूख उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण झाले. स्पर्धांना परीक्षक म्हणून डॉ. एस. व्ही. पोरे, डॉ के. एन. निकम, डॉ. टी. एम. वांडरे, डॉ. अनामिका कदम होते. ऐश्वर्या दाडमोडे, अनिता गुरव या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक समन्वयक डॉ. चंद्रकांत माने यांनी केले. निकाल वाचन प्रा. अशोक चव्हाण यांनी केले तर डॉ. प्रशांत यादव यांनी उपस्थितांचे आभार मानले. स्पर्धेचा निकाल विभागानुसार अनुक्रमे पुढीलप्रमाणे,

ह्युमॅनिटीज, लॅंग्वेज, फाईन आर्टस या विभागात विद्याश्री पुरोहित (डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर), शीतल संकपाळ (शहाजी महाविद्यालय, कोल्हापूर) ऋषिकेश पचागणे (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर) शिवानी धोंगडे (वारणा महाविद्यालय, वारणानगर विभागून तृतीय क्रमांक) कॉमर्स मॅनेजमेंट, लॉ या विभागात प्रियांका पुरोहित (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर) पुष्कर सराफ (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर) पूजा पाटील (व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी) प्यूअर सायन्स या विभागात यश आंबोळे (न्यू कॉलेज, कोल्हापूर), प्राची चव्हाण (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर), राधिका पाटील (कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूर), रुची जगड (स्कूल ऑफ नॅनो सायन्स अॅण्ड टेक्नोलॉजी, कोल्हापूर विभागून तृतीय क्रमांक). अॅग्रीकल्चर अॅण्ड ॲनिमल हजबंडरी या विभागात अनुक्रमे क्रमांक अशी, सोनाली पवार (विजयसिंह यादव महाविद्यालय पेठ वडगाव) साक्षी देवळेकर (टेक्नोलॉजी विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर), श्रध्दा पाटील (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज), इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नोलॉजी या विभागात अनूजा बेलेकर (डिकेएएससी कॉलेज, इचलकरंजी) शुभम पाटील (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर) रुपाली खैरे (जयसिंगपूर महाविद्यालय), श्वेता कदम, टी. के. आय. ई. टी. कॉलेज, वारणानगर विभागून तृतीय क्रमांक, मेडिसीन अॅण्ड फार्मसी विभागात सुमित टिळे (टी. के. आय. ई. टी. कॉलेज), अर्चना जाधव (तात्यासाहेब कोरे ऑफ फार्मसी, वारणानगर), नेहा पाटील (कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर).

# महेश काकडे यांना एक्सलन्स अवॉर्ड



कोल्हापूर : नवी दिल्ली येथील इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशनतर्फे देण्यात येणाऱ्या अॅवार्ड ऑफ एक्सलन्स इन अॅडमिनिस्ट्रेशन हा पुरस्कार शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांना जाहीर करण्यात आला आहे. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते व सचिव विजय सौरभ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (ता. ५) पुरस्कार प्रदान करण्यात येईल. ठाणे येथे हा कार्यक्रम होणार आहे.

लोकमत

## शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा : बहुउद्देशीय शेतीयंत्र, दिव्यांगांना रस्त्यातील अडथळे सांगणारे यंत्र

# विविधांगी संशोधनाची मांडणी आविष्कारातून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अवघ्या दोन हजारांत साकारलेले बहुउद्देशीय शेतीयंत्र, मोबाईल आणि ब्लूटूथच्या वापरातून दिव्यांगांना रस्त्यातील अडथळे सांगणारे यंत्र, आदी स्वरूपांतील संशोधनाचा 'आविष्कार' कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनींनी शुक्रवारी सादर केला. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात मध्यवर्ती आविष्कार संशोधन स्पर्धा झाली.

विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित या संशोधन स्पर्धेचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत मानव्यशास्त्र, भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यक व औषधनिर्माणशास्त्र अशा विविध विषयांमधील ३६ संशोधक सहभागी झाले. त्यातील इस्लामपूरच्या केबीपी कॉलेजच्या रमेश हजरदिगरी याने मोबाईलचा खराब चार्जर, एलईडी वापरून पथदिव्यांच्या सनियंत्रण पद्धतीचे संशोधन मांडले. पूजा मुळीक हिने सांगली जिल्ह्यातील तृतीयपंथीयांबाबतचा अभ्यास भित्तिपत्रकातून मांडला. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शुभम पाटील याने मोबाईल आणि ब्लूटूथच्या वापरातून दिव्यांगांसाठी दिशा आणि रस्त्यावरील अडथळे सांगणारे साधन सादर केले. त्यामध्ये त्याने कृत्रिम बुद्धिमत्ता संकल्पनेचा वापर केला. सातारा येथील अरविंद गवळी कॉलेजच्या गणेश फरांदे, श्रेया जाधव, प्रतिमा चव्हाण, अभिजित सावरकर यांनी पेट्रोलचे उत्सर्जन रोखणारा व्हॉल्व्ह आणि पेट्रोलच्या टाकीचे संशोधन सादर केले. पलूसच्या आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या सोहेल मुल्लाणी याने सायकल आणि टाकाऊ साहित्यापासून अवघ्या दोन हजारांत बनविलेले बहुउद्देशीय शेतीयंत्र या स्पर्धेत मांडले. या यंत्रासाठी इंधन, वीज लागत नाही. त्याच्या माध्यमातून पेरणी, कोळपणी, वैरण कापणे, आदी विविध शेतीविषयक कामे करता येतात. नीलम माने हिने कोरफड, तुळस, लिंबू यांच्या मिश्रणातून साकारलेल्या पर्यावरणपूरक साबणाचे संशोधन सादर केले. विटा येथील बळवंत कॉलेजच्या प्रज्ञा भगत हिने मोबाईलद्वारे घरातील वीज चालू-बंद करणाऱ्या उपकरणाचे संशोधन मांडले. सांगलीवाडीतील डॉ. पतंगराव कदम कॉलेजच्या कौस्तुभ वाडकर आणि सूरज पाटील यांनी सौरऊर्जेवरील जनरेटर सादर केला आहे.

### अभ्यासपूर्ण मांडणी

या स्पर्धेत भीत्तिपत्रकांद्वारे काही स्पर्धकांनी संशोधन, शोधनिबंध सादर केले. त्यात अपव्यय होणाऱ्या अन्नाचे व्यवस्थापन, कॅशलेस व्यवहारांची स्थिती, डोंगरउताराचा शाश्वत पाण्यासाठी वापर, आदी विषयांची अभ्यासपूर्ण मांडणी केली.





नसीर अत्तार

**कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातील आविष्कार संशोधन स्पर्धेत पलूसच्या आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या सोहेल मुल्लाणी याने बहुऊद्देशीय शेतीयंत्र सादर केले. दुसऱ्या छायाचित्रात केबीपी कॉलेजच्या रमेश हजरदिगरी याने पथदिव्यांच्या सनियंत्रण पद्धतीचे संशोधन मांडले होते.**

# 'आविष्कार'च्या माध्यमातून उपयोगी संशोधन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शेतातील मशागतीची कामे एकाच यंत्राने दिव्यांगांना रस्त्यातील अडथळे सांगणारे मोबाईल तंत्र असे भन्नाट आयडिया व उपयोगीतामूल्य असणारे संशोधन 'आविष्कार' च्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांनी सादर केले. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात मध्यवर्ती आविष्कार संशोधन स्पर्धा शुक्रवारी झाली. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित या संशोधन स्पर्धेचे उद्‌घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत मानव्यशास्त्र, भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यक व औषध निर्माणशास्त्र अशा विविध विषयांमधील ३६ संशोधक सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले संशोधन अमूल्य असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी मान्यवरांनी दिल्या.